**निशाणी क्र.८१ वरील आदेशानुसार प्रतिवादी क्र.४ यांच्या शपथेवर पुढील उलटपास प्रतिवादी क्र.२ व ३ तर्फे अधिवक्ता श्री.एस.एस.कश्यप यांच्या मार्फत :—**

**०८.** माझे शिक्षण दहावी पर्यंत झाले आहे. हे म्हणने खरे आहे की, मी नागपूर येथील माझया मोठया भावाकडे गाडी शिकण्यासाठी गेलो होतो. हे म्हणने खरे आहे की, त्यावेळी मी त्यांच्या बरोबर राहत होतो. हे म्हणने खरे आहे की, आज रोजी मी दुस—या जागेवर सारखाच व्यवसाय करत आहे. हे म्हणने खरे आहे की, त्यामुळे आमच्या मध्ये बोलणे बंद आहे. याबाबत मला माहिती नाही की, माझया आईच्या तब्येत खराब असतांना ती नागपूरला माझया भावा कडे उपचार करण्याकरिता गेली होती. हे म्हणने खरे आहे की, माझया आईची तब्येत खराब होती. याबाबत मला माहिती नाही की, माझया आई बरोबर माझे वडिल ही गेले होते.

**०९.** प्रस्तुतच्या शपथपत्राबरोबर काही कागदपत्र दाखल केले की नाही हे मला आठवत नाही. त्याबाबत माझया वकिलांना माहित आहे.

**प्रश्न :** आता प्रस्तुतच्या केस बघुन सदरचे कागदपत्र दाखल केले की नाही याबाबत तुम्ही सांगु शकता का ?

**उत्तर :** सदरच्या केसचे रेकॉर्ड मोठे असल्यामुळे मी आता ते सांगु शकत नाही.

सदरील शपथपत्रातील पॅरा क्र.१ मधील उल्लेख केलेले कागदपत्र मी दाखल केलेले नाही. तसेच मी पॅरा क्र.२ ते १४ मध्ये उल्लेख केलेले कागदपत्र प्रस्तुतच्या केसमध्ये दाखल केलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, मी सदरचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

**१०.** हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.४८ माझया म्हणण्यानुसार दाखल करण्यात आलेला आहे. मला सदरचे निशाणी क्र.४८ माझया वकिलांनी मराठीमध्ये समजुन सांगितले होते. हे म्हणने खरे आहे की, पॅरा क्र.८ ब मधील मजकूर खरा आहे व सदरील मिळकतीमध्ये माझे सध्या जाणे—येणे नाही. माझया पत्नीचे नाव जया आहे व माझया मुलाचे नाव प्रज्वल आहे. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ वर दाखल केलेले दोन नंबरचे बक्षिसपत्राने माझया पत्नीच्या व मुलाच्या नावाने आहे. आता मला सदरचा दस्त दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.८३** देण्यात येते. हे म्हणने खरे आहे की, लिहून देणार म्हणून माझे वडिल आहे. हे म्हणने खरे आहे की, त्या

खरेदीखतामधील ज्या जागेचा उल्लेख आहे त्या जागेचा उल्लेख निशाणी क्र.४८ मध्ये ही केलेला आहे. हे म्हणने खरे आहे की, कमलाबाई यांनी माझे आजोबा यांच्या वर केस केली होती व सर्व वारसांना पक्षकार केले होते. हे म्हणने खरे आहे की, त्या केसमध्ये ही वाद मिळकतीचा उल्लेख होता व न्यायालयाने दि.१०.११.२००८ च्या न्यायनिणर्यानुसार सर्वाना १/७ प्रत्येकी हिस्सा दिला होता. याबाबत मला माहिती नाही की, न्यायालयाच्या आदेशानुसार आलेल्या हिस्सयाचे वाटणीपत्र करण्यात आले होते. हे म्हणने खरे नाही की, मी वर्धा येथील न्यायालयात वाटणीपत्र रद्द करण्यासाठी केस केली आहे. साक्षीदार सांगतो की, मी माझया हिस्सा मागण्यासाठी केस केलेली आहे. मी निशाणी क्र.४८ हे वर्धा न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यानुसार मी वाटणीपत्र रद्द करण्याची मागणी केलेली आहे. हे म्हणने खरे नाही की, सदरचे पार्टिशन हे न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे करण्यात आले होते. मी न्यायालयाचे आदेश निशाणी क्र.४९ आव्हानीत केलेला नाही. हे म्हणने खरे नाही की, सदरचे वाटप हे बरोबर झालेले आहे.

**११.** हे म्हणने खरे नाही की, माझया वडिलांनी त्यांच्या हिस्सयात आलेली मिळकत ही त्यांच्या नातीच्या नावाने बक्षिसपत्र करुन दिली होती. हे म्हणने खरे नाही की, त्याचप्रमाणे माझे वडिलांनी प्रतिवादी क्र.२ यांना ही काही शेतजमिन बक्षिसपत्र करुन दिली होती. हे म्हणने खरे आहे की, वडिलोपार्जित जमीन ही जितेंद्र कांबळी यांनी खरेदी केलेली आहे. याबाबत मला माहित नाही की, त्यापैकी दहा लाख रुपये माझया वडिलांना मिळालेले होते व सदरचे दहा लाख रुपये माझया वडिलांनी वादीला दिले होते. याबाबत ही मला माहित नाही की, सदरच्या पैश्यामधुन वादी त्याच्या व्यवसाय करतो. याबाबत मला माहित नाही की, निशाणी क्र.८३ मध्ये नमूद केलेली प्रॉपर्टी ही माझया मुलाला व पत्नीला बक्षिसपत्राने दिलेली होती. याबाबत मला माहित नाही की, कॅनलमध्ये गेलेल्या जमिनीच्या मोबदलाबद्दल आलेले पैसे माझया वडिलांनी प्रतिवादी क्र.५ ला दिले होते. हे म्हणने खरे नाही की, माझे वडिलांनी माझया पत्नीला व मुलाला करुन दिलेल्या बक्षिसपत्रातील जमीनीवर प्रतिवादी क्र.२ व ३ चा ताबा आहे. हे म्हणने खरे नाही की, सदरील जमिनीवर कोणाचा कब्जा आहे हे मला माहिती नाही. निशाणी क्र.४२ वरील मिळकतीवर ताबा विकास प्रभाकर पेटकर यांचा आहे. तसेच निशाणी क्र.४४ मध्ये ताबा अनुप विकास पेटकर यांचा आहे. हे म्हणने खरे नाही की, दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.२ व ३ चा कब्जा आहे. हे म्हणने खरे आहे की, वडिलोपार्जित मिळकतीमध्ये हिस्सया मिळण्यासाठी प्रस्तुतची केस दाखल केली आहे. याबाबत मला माहिती नाही की, सदरची केस ही वाटप रद्द करण्याकरिता केलेली आहे. हे म्हणने खरे आहे की, प्रस्तुतचा दावा हा वडिलांनी करुन दिलेले बक्षिसपत्र रद्द करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे. हे म्हणने खरे आहे की,

सदरचे केस मध्ये आम्ही परिवार मधील सर्व लोक पक्षकार आहे. हे म्हणने खरे आहे की, वर्धा न्यायालयातील केसमध्ये परिवारातील लोकांबरोबर इतर सातबारामधील उल्लेख केलेल्या लोकांनाही पक्षकार केलेले आहे. हे म्हणने खरे नाही की, वडिलोपार्जित मिळकतीवर आज रोजी इतर लोकांचे घरे आहेत. हे म्हणने खरे आहे की, प्रस्तुतच्या केसमध्ये माझया भावाने सातबारामध्ये उल्लेख असलेले सर्व लोकांना पक्षकार केलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, प्रस्तुतचे प्रतिज्ञापत्र हे मी माझया भावाला मदत करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.03.10 16:54:26 +0530

(एस.आर.सातभाई)

**दि.** १०.०३.२०२६ दिवाणी न्यायाधीश, क.स्त. सेलू.